Savarkar, Vinayak Damodar

मराठी संशोधन–मंडळ प्रकाशन

# सावरकरांच्या अप्रसिद्ध कविता

Savarakarañcya aprasiddha Kavita

संपादक

डॉ. स. गं. मालशे

मराठी–विभाग प्रमुख, श्री. ना. दा. ठाकरसी विद्यापीठ, मुंबई.

मराठी संशोधन–मंडळ

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई १४

१९६९ 1969

मूल्य १ रुपया

डक्यावर 'पद्यलेखसंग्रह, भाग १ ला' असे म्हटलेले आहे. या पृष्ठाच्या पाठीवर
कवीची छोटी गद्य 'प्रस्तावना' आहे. तिच्याखालीं '१०–१२–१९०३ नासिक'

( २ ) मायदेवसंपादित आवृत्तींतील ' स्वदेशीचा फटका ' या कवितेचें वहींतील शीर्षक ' स्वदेशी कापड ' असें आहे. ती ' जगद्धितेच्छूं'तून कापून चिकटविलेली आहे. " दोषस्थलांची क्षमा असावी -आपला, विनायक दामोदर सांवरकर " असा शेवट आहे. 'सावरकर' हें उपनांव पहिल्या कालखंडांत 'सांवरकर ' असें सानुस्वार लिहीत.

( ३ ) ' शिववीर ' या मायदेवसंपादित आवृत्तींतील कवितेचें वहींतील नांव ' शिवाजी ' असें आहे. ' मुक्काम त्र्यंबकेश्वर येथें मंडळींचे आग्रहावरून केलें, २७-१२-१९०३ वय २० वें ' असा शेवट आहे.

( ४ ) मायदेवसंपादित आवृत्तींतील ' छंद नसे चांगला ! ' या कवितेचें वहींतील शीर्षक ' रंडीबाजी ' असें आहे. तिचा पहिला चरण ' मन्मन-मित्राच्या कासारा रंडिबाजिचा तुला ! गड्या रे छंद न हा चांगला ॥' असा आहे. म्हणजे कवितेच्या शीर्षकांतील आणि प्रथमचरणांतील ' रंडिबाजी ' हा ग्राम्य शब्द परिष्करणांत बदललेला आहे, असें दिसतें. मायदेवसंपादित आवृत्तींत ' केरळकोकिळकारांचें स्वागत ' या शीर्षकाची कविता आहे. तिचें वहींतील शीर्षक ' स्वागत ' असें आहे आणि शेवटीं टीप आहे: " ह्या केरळकोकीळकर्ते रामहरीस भेटण्यास आले तेव्हां केलेल्या आहेत. " ' रामहरी ' हें मित्रमेळ्याचें सांकेतिक नांव असावें.

( ५ ) मायदेवसंपादित आवृत्तींतील ' केतकरप्रशस्ति ' ही कविता वहींत ' केतकरांचें स्मारक ' या नांवानें आहे. ती कात्रणस्वरूपांतच आहे. समग्र सावरकर वाङ्मयाच्या ७ व्या खंडांत ते ( श्लोक ) त्या वेळीं ' लोकसत्ता ' ह्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले होते ' असें या कवितेच्या प्रास्ताविकांत म्हटलें आहे ( पृ. २० ). पण तेथें थोडी चूक दिसते. कारण कविता संपल्यावर खालीं ' एक्स्ट्रा लोकसेवा, ता. २२-४-१९००' हें त्याच वृत्तपत्राच्या अंकांत मुद्रित झालेले शब्द चिकटविलेले आहेत. या कवितेचे शेवटचे दोन श्लोक मुद्रित आवृत्त्यांत नाहींत. ते श्लोक असे:—

आतां ईशपदीं असे सुविनती कीं, ' हे प्रभो ज्या पहा ॥
दुर्दैवें बनल्या अनाथ रडती देतात त्या शाप हा ॥
कोणी राजपदामृताप्रति सदा सेवूनि संतुष्ट ते ॥
घेती आपण आपलेच भंवती ओवाळुनी दुष्ट ते ॥६॥

निद्रा भोजन स्वार्थ यांतचि किती ते दंग, नाहीं परी ॥
बापूंचे प्रिय कन्यकांस असरा, होवो कृपा त्यांवरी ॥
कोणी केतकरासमान दुसरा होवो पुढारी सदा ॥
संस्था त्या उपयुक्त रक्षण करो ! हीची विनंती पदा ॥७॥



या कवितेच्या प्रारंभीं पुढील टीप आहे:– 'खालील श्लोक नासिकचे प्रसिद्ध बापूसाहेब केतकर यांचें स्मारकाचे वेळेस रा. ' लोकसेवा 'कर्ते यांचे विनंतीवरून त्यांस करून दिले. स. १९००, वय १७. '

पुढें प्रसिद्ध केलेल्या अप्रसिद्ध कविता काव्यदृष्ट्या उजव्या ठरणाऱ्या आहेत. असें नाहीं. पण त्यांना ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व आहे. १९०३-४ पर्यंतचा काळ हा सावरकरांच्या कविजीवनांतील उमेदवारीचा काळ म्हणतां येईल. या काळांत कवि अनुकरणशील होता. मोरोपंतादि पंडित कवींचा ठसा त्याच्या कवितेवर दिसून येतोच. तरीहि या काळांतील कवितेंतून देशभक्तीचा धागा अखंडच आहे. ' मातृशोकालपाष्टक ' सारखी व्यक्तिजीवनाशीं निगडित कविता असो, वा न्यायमूर्ति रानड्यांच्या निधनासारखी समाजमनस्कतेंतून स्फुरलेली कविता असो, मित्राला पाठविलेला कवितावद्ध तिळगूळ असो, वा विवाहाभिनंदन असो, त्यांतून कवीची स्वातंत्र्यलालसा प्रकट झाल्यावांचून राहत नाहीं. यांतल्या कांहीं कविता मागणीनुसार करून दिलेल्या आहेत, त्यावरून सावरकर त्या काळीं शीघ्रकवित्वाविषयीं प्रसिद्ध असावे, असें दिसतें.

# प्रस्तावना

यांत मी केलेल्या आजपर्यंतच्या कवितेंतील निवडक कविता उतरून एकत्र केल्या आहेत. अगदीं पहिल्या कविता वयाचे ११ वे वर्षी केल्या. पण यांत बऱ्याच पुढील्पासुन घेतल्या आहेत. या उतरतांना त्यांत सुधारणा करण्यास योग्य अशीं स्थलें दिसताहेत, तरी त्या न करतां तशाच उतरल्या आहेत. कोठें सबंध उताऱ्याचे ऐवजीं त्यांतील कांहीं भागच उतरून घेतले आहेत. ज्या कांहीं कविता छापून आल्या आहेत, त्यांपैकीं कांहीं तशाच छापलेल्या डकविल्या आहेत. कालानुक्रम कळण्याकरितां प्रत्येक कवितेचे खालीं तिचा रचनेचा सन दिला आहे.

१०–१२–१९०३

नाशिक



—१—

## नाशिक येथील इ. स. १८९७ च्या गणेशोत्सवावरील

॥ आर्या ॥

वंदुनि प्रथम भवानी वर्णी गेल्या गणेशउत्साहा ॥
कीं हिंदु बांधवांसी आधारचि कामधेनु वत्सा हा ॥ १ ॥

जरि पुण्यपत्तनासम गजबजला ना तरी असामान्य ॥
झाला तोची बहु कीं लघुसौभद्रहि जनीं जसा मान्य ॥ २ ॥

प्रथम चतुर्थी येतां उत्कट आनंदभरित जन झाले ॥
भावें सकलजनांनीं शिवकुमरा गणवरासि आठवले ॥ ३ ॥

होते मेळ तयारचि जरि चारचि तरि बहूत सुंदर ते ॥
गणराजकीर्तिधीला शोभे सुंदर कराचि बंद रते ॥ ४ ॥

त्या निशि पुराण गर्दी गणराया गावयास गवयांची ॥
लटपट जन खटपटती मुकले जे त्या कशास चव याची ॥ ५ ॥

रस्तोरस्तीं स्तविती गणराया वदति " तार आर्या या " ॥
प्रभुजी, असह्य हरहर चिरती चरचर हजार गाया यां ॥ ६ ॥

ज्या आर्यांचा पदमलतेज शमाया हरादि खटपटती ॥
दैदिप्यमान ब्राह्मण गोरे तेची बघून लटपटती ॥ ७ ॥

जीं रामकृष्णवासें सत्क्षत्रें पावलीं अशा सुपदा ॥
हरहर त्यांतचि ब्राह्मण भोगिति निर्बंधनें सदा अपदा ॥ ८ ॥

ज्या शूर पूर्वजांनीं जरिपटका थेट अटकिं फडकविला ॥
त्यांचेच अम्ही वंशज भ्याडाकृति ज्या कथासि नड कविला ॥ ९ ॥

आज विजापुर उदइक दिल्ली कीं चालले पन्हाळगडा ॥
राव भंरारी जेथें हि स्थिति तेथेंचि लाजवी दगडा ॥ १० ॥

राजा परकी शिक्षण परकी लक्ष्मीहि जाहली परकी ॥
आतां प्रभो दयाळ, तुजविण कोणीच ना रिपू हाकी ॥ ११ ॥

तरि गणराया समया करिं या बदला धरा हरा अपदा ॥
अपराध क्षमा व्हावे हे दीन तुझेचि दास स्तविति पदा ॥ १२ ॥

नरवर विघ्नहर प्रभु सुखकर भयहर स्मरारि प्रिय अंमरा ॥
अजरा विश्वाधारा भक्तवरा तुज नमोस्तु शिवकुमरा ॥ १३ ॥

—२—

खालील आर्या लोकमान्य टिळक तुरुंगांतून सुटले तेव्हां त्याबद्दल मिळालेल्या सुटींत केल्या. वय १५. सन १८९८. ('जगद्धितेच्छु, पुणे' ह्या पत्रांत छापून आल्या होत्या.

॥ श्री योगेश्वरी प्रसन्न ॥

रा. रा. जगद्धितेच्छुकर्ते यांसः—

सा. न. वि. विशेष—कृपा करुन आपल्या जगन्मान्य पत्रांत खालील मजकूर छापाल अशी आशा आहे.

### श्रीटिळक–आर्यभू भेट

ये ये बाळा ये ! क्षेम असो ! हो शतायु कुलतिलका ॥
भरतें ये दाटुनि किति ? स्वास्थ्य असे कीं गुणानुकुलटिळका ॥ १ ॥
दे भेट, जवळि ये चल चुंबन करण्यासि चित्त उत्सुकलें ॥
गेले ते दिन गेले, 'बाळा' किति तरि शरीर तव सुकलें ॥ २ ॥
एकेक मोजुनी दिन अब्दवरी अंतरासि साहियलें ॥
पळभरहि धिर न धरवे तोंच सुदैवें मुखासि पाहियलें ॥ ३ ॥
कां तेथेंचि उभा रे ? वाटे कीं ही न आपली दाई ॥
परि शोकें कृश ऐसी स्तनपान्हा–चिन्ह तापली दाई ॥ ४ ॥
कीं आश्चर्यें थकचि शुद्धीपूर्वींच ही कशी शिवते ॥
'बाळा,' प्रेमउमाळा शुद्ध स्वयें ? मान मानसीं शिवतें ॥ ५ ॥
कीं क्रुद्ध मानसीं तूं ? ओवाळायासि केंवि आउ नये ॥
भेटीसि विलंब नको, ऐक तसें कीं गृहांत जाउं नये ॥ ६ ॥
'श्री बाळ' बहुप्रेमें धांवे तों आर्यजननि घेच करीं ॥
सप्तमि दिनीं सकाळीं भेटीला दाटली घनश्चकरी ॥ ७ ॥

दोषस्थलांची माफी असावी.

नाशिक ता. ७–९–९८ आपला

एक क्ष



—३—

# इतर स्फुट कविता

## भाग १ ला

उपवर स्तुतिकन्ये मानला बाळ भारी ॥
परि सवतिभयें तो नित्य तीतें निवारी ॥
करुनि मग गुणांहीं युक्त त्यातें सुकंठीं ॥
दृढ कवळुनि आतां नित्य ती काळ कंठी ॥ १ ॥

दुरोनी ऐकोनी वरगुणगणांलुब्ध रमणी
मृगाक्षी कीर्ति ये टिळक वरण्या उत्सुक मनीं ॥
परी कारागारीं वसत न कळोनी न भवनी ॥
प्रियातें शोधाया भटकत फिरे ती त्रिभुवनीं ॥ २ ॥

हे दोन श्लोक लोकमान्य रा. टिळकांवर ते कारागृहांत असतांना (भोजनसमयीं) रचले आहेत. सन १८९८.

### प्लेगवरील दोन श्लोक

देखोनी अतिरम्य स्थान उतरे जो मुंबई बंदरीं ॥
ज्या सारे जपती, त्वरें लपति यत्कोधें दरीकंदरीं ॥
जिज्ञासा धरुनी घरोघर समाचारास जो घेतसे ॥
तीर्थें क्षेत्रपुरें प्रसिद्ध नगरें आलोकण्या जातसे ॥ १ ॥

ऐसा हा नृपराज प्लेग भटके देशांत ह्या तो सवें ॥
भेटे जो जन त्यास दंड करितो काळा न जो सोसवे ॥
देतो शासन मूषकांकडुन कीं मी येत आहे हटा ॥
जागा द्या; मग दंडितों पळतिना पेटोनियां जे हटा ॥ २ ॥

### काळावर

त्या काळास असो सदा नमन जो नांदे सुखें डोलतां ॥
धाता हाटवितां; चिरंजिव ठरे वातात्मजा.तोलतां ॥
जा मागें परते न लेश न कधीं जो थांबतो चालतां ॥
कल्पीतां वितळे; रतीभर न भूकंपेंहि जो हालतां ॥ १ ॥

मार्गा आक्रमितां सदा करितसे कोट्यानुकोटी कृती ॥
ज्याहीं सुष्ट जनांस सत्फल मिळे, दुष्टां जनां विकृती ॥
ज्ञाता जो इतिहासचिंतक असा पावे सुखा लोकिं तो ॥
यासाठीं गतवर्षवृत्त-समुदायालागिं आलोकितों ॥ २ ॥

हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीवर शुकान्योक्ति

वनिंउपवनिं ज्याहीं रम्य वृक्षां वरीलें ॥
सुफल सरस तोया मञ्जरीतें वरीलें ॥
उडुनि पडुनि घेतो बैठका साजऱ्याही ॥
अहहह ! शुकसा तो पिंजरीं आज राही ॥ १ ॥

कोकिलान्योक्ति

डुलत तरुवरांच्या उच्च भागीं तगावें ॥
पवनसमार्थे झोंके घेत सद्गीत गावें ॥
युवति भंवतिं याव्या शोभना आयकाया ॥
पिक अजि तव टोंची काक रे हाय काया ॥ १ ॥

कमलान्योक्ती

सुरतनु-धवलांगी जान्हवी ज्यास वीते ॥
स्वकर शिणवुनीयां मानिलें ज्या सखीतें ॥
सकल सुरवरांच्या आरुढे शीर्षभागीं ॥
कमल सुकुनि गेलें हाय रानीं अभागी ॥ १ ॥

स्वातन्त्र्यदेवीवर

जीच्या धन्य पदारविन्दमकरन्दा स्वादण्या झुंजती ॥
श्रीमत्र्यंबक अंबरेश अलिसे गुंजारवा गुंजती ॥
वंद्या मानिति अंबिकादितिरमानंङ्गांकसंङ्गास त्या ॥
श्री मांगल्य शिवप्रदेसि नमितो स्वातंत्र्यदेवीस त्या ॥ १ ॥



—४—

संक्रांतीचे तीळगुळ

सुप्रेम योजुनि वरा तिळ शुभ्ररागें ।
पाकोनियां सुसहवास रसांत आंगें ॥
मित्रत्व-अंकुर फुटे सहजीं सुयोगें ।
सौजन्य-केशर पुढें मग फार रंगे ॥ १ ॥
संक्रांति-क्रांति घडतां सण हा उदेला ।
आनंद नंदनवनासम येथ झाला ॥
पत्रा सुपात्र गणुनी कविता-वधूला ।
आज्ञापिलें तिळगुळा तुज अर्पिण्याला ॥ २ ॥
ह्या आदरा, उपरि प्रेम असेंच ठेवा ।
होवो सशास्त्रगुण ह्यां मन हाचि ठेवा ॥
श्री राजश्रेष्ठ शिवकीर्तिरसास सेवा ।
जेवा यथेष्ठ न असा इतरत्र मेवा ॥ ३ ॥

हे श्लोक संक्रांतीनिमित्त एका मित्रास धाडले होते.
ता. ३०-१-१८९९

—५—

श्रीयोगेश्वरी प्रसन्न

मातृशोकालापाष्टक

॥ आर्या ॥

माते सोडुनि झालीं आम्हाला येथ आज सा वर्षें ॥
बरवें नांव वगळिलें ? दुःखाग्निंत मेघ हा जसा वर्षें ॥ १ ॥
गेलीस नाइलाजचि आतां जातीस तूं जरी माते ॥
मी काय सोडितों तुज, शतगुण तप्ता जरी जरी' माते ॥ २ ॥
वाटे असशील खरी नित्य सुखें आज तूं विटलि नाकीं ॥
ग्रंथश्रवणोत्पादक स्वर्गाची हौस तव फिटलि ना कीं ? ॥ ३ ॥
पालट जाउं कराया पुत्रालिंगन सुखें जरी माते ॥
माते इच्छा तरि बरि लघिमा परि येथ ना गरीमा ते ॥ ४ ॥

क्षण थांब अनुसरोनी सत्पथ, साधु, श्रुतित्रयाला हो ।
नवरी वरील कीर्ति सुजन म्हणो कीं सुपात्र याला हो ॥ ५ ॥

त्या त्रयगामिनिला मग पुरवाया कामनेसि आगमना ।
करण्या आज्ञापिन मीं स्वर्गीं द्यायासि तोष सांग मना ॥ ६ ॥

मच्छाया मानुनियां मम ठायां ती सुखें तिला भेटे ।
दाटेल तुझा कंठहि चुकशिल तव वृत्त कळविण्या वाटे ॥ ७ ॥

वंदन पदकमलीं तव नंदन करि गीत गात आर्यांत ।
मंद न धी होउ, झिजो चंदनसा देह देशकार्यांत ॥ ८ ॥

ह्या आर्या अत्यंत नम्रत्वें माझ्या परलोकवासी मातेला अर्पण केल्या आहेत.

१. म्हातारी

३१-१-१८९९
वय १६

—६—

झाली प्रभात सुटला बहु थंड वारा ।
जेथें तिथें मुदित हा जन होत सारा ॥
प्रातर्विधि बहु त्वरें उरकोनि घेतों ।
" घ्या पत्र " हा ध्वनि अकस्मिक कीं निघे तो ॥ १ ॥

उडाली त्वरें एक घाई पुसाया ।
" शिपाई बुवा, काय पत्ता ? बसा या. " ॥
टकां लावुनी पाहतों तीन भाऊ ।
तशी दूर ठाके उभी ती न भाऊ ॥ २ ॥

मनीं सर्व उत्सुक मन्नाम वाचो ।
शिपाई भला तो बहु काळ वांचो ।
असो पत्र माझ्या सुमित्रेश्वराचें ।
गणीं फार आभार विश्वंभराचे ॥ ३ ॥

अवचितां ध्वनि गोड उठावतो ।
परिसतां न सुखा मुळिं ठाव तो ॥
वरि ' विनायक ' नायक पत्रिका ।
इतर उत्तर बोलति " हा ठका " ॥ ४ ॥



झडप झडकरी मी घालुनी पत्र घेतों ।
चकित किति कवीताबद्ध त्याला बघे तो ॥
पुरवि रवि तशी ती पत्रिका कामनाला ।
रविपरिस परी ती तोषदाई मनाला ॥ ५ ॥

शशी यद्यपी शीत संतापहा हा ।
तरी विव्हला देत संताप हा हा ॥
रवी सर्व निर्दोष तो तापदायी ।
गुणांच्या सवें दोष हा नित्य राही ॥ ६ ॥

जरी मी नसे एक वक्ता प्रसिद्ध ।
न वाग्देवता साह्य होवोनि सिद्ध ॥
असें मंद, ना देखिली काव्यशक्ति ।
तरी दोष दावी, क्षमा या असो ती ॥ ७ ॥

विनत हा प्रणिपात शतें करी ।
धरि न राग करां चल दे करीं ॥
जरि न धाडिसि उत्तर लौकरी ।
हरिच संशय, मी बनलों करी ॥ ८ ॥

तुझा येथ येण्या जरी फार हेतू ।
तरी काल ना योग्य हें जाण हें तूं ॥
असो मी अजारी सहे दुःख भारी ।
नसे अर्थ कांहीं म्हणोनि निवारी ॥ ९ ॥

एका मित्रास टाकलेल्या पत्रांतील पद्यात्मक भाग आहे.

४-५-१८९९
वय १६ वे

—७—

## आर्या

कुलजे सुभगे माझा गे आशीर्वाद तुजसि हा पावो ॥
मन्मित्रपत्नि तूं तव कार्यक्षमता सुकीर्ति जन गावो ॥ १ ॥
आकाश फाटलें तरि थिगळानें त्यास केविं झांकावें ॥
धैर्यालंबन करुनि कर्मगतिपुढें मुकेचि वांकावें ॥ २ ॥

अपल्यापरिसहि गुरुतर संकटग्रस्तास पाहुनी समजा ॥
व्हा शांत हृदय कीं ह्या शांतिसम तुजी न संकटांत मजा ॥ ३ ॥

धनसंबंधीं ठेवा विश्वास न, हें भल्यास लोभवितें ॥
सद्वर्तन शुचि राहो कीं हें कुलजांस फार शोभवितें ॥ ४ ॥

लेखनवाचन अपणां येतें हें फार फार बरवेंचि ॥
सद्ग्रंथकनक कणकण संतत व्हायास तूं गबर वेंचीं ॥ ५ ॥

आशीर्वाद असे त्या बाबूला आणि उभय कन्यांना ॥
कीं सद्विद्याश्रीधी पावाया ना म्हणोत धन्या ना ॥ ६ ॥

त्वल्लिखित उत्तरातें धाडी वृत्तांत त्यांत कळवावा ॥
वळवावा श्रीश मनें स्वकुलाचा कीर्तिपट न मळवावा ॥ ७ ॥

एका कुलजेला धाडिलेल्या पत्रांतील हे वेंचे आहेत.

सन १९००, वय १७ वें

—८—

॥ आर्या ॥

हा मित्र मित्रश्रेष्ठा ! प्रेमभरें करित हें तुला नमन ॥
निन्दु नको, अर्पाया कधिं ढळलों सख्य हें तुला न मन ॥ १ ॥

विसरुनि कृतापराधा निन्दुनि सभ्यास, मळवुनी रसना ॥
यश काय जोडिलें त्वां सुधिमत वच वद, असत्य नीरस ना ॥ २ ॥

मित्रद्रोह न केला आम्ही, वदा सत्य हें, तुवां केला ॥
गेलासि स्पर्धेनें धरुनि महत्त्व हेतु वा केला ॥ ३ ॥

उपदेश मज न करणें आपणची मित्रधर्म सांभाळा ॥
वर्तन उपदेशाला दे शोभा, तिलक तो जसा भाला ॥ ४ ॥

टपलास मित्रदोषा लक्षाया तूं जईं सदा बकसा ॥
ह्या बोधाचा तईं तव हृदयावर राहिला न दाब कसा ॥ ५ ॥

सकला प्रिय, अप्रिय तुज तुजविण जन सर्व सख्य मारीं करितो ॥
कीं सकल मोददायी कामिजनांना असह्य शशिकर तो ॥ ६ ॥



जरि वरि न दावि तरि मम अंतरिं आत्मा खराच कलकलतो ॥
कपटाभिमानविगलित वागावें, धर्म हा सकळ कळतो ॥ ७ ॥

अपराध तुझे असती तैसा मीं ही असेन अपराधी ॥
अन्योन्य तयां विसरूं त्वद्विजयीं मम असे न अपरा धी ॥ ८ ॥

सूज्ञचि असती तूंतें स्यां मूढें काय बोध शिकवावा ॥
हंगाम सुखाचा सद्वर्तनजल शिंपडोनि पिकवावा ॥ ९ ॥

एका मित्रास त्याच्या पत्राचें उत्तर. सन १९००
वय १८ वें.

—९—

## ॥ माझी नम्र तक्रार ॥

( कै. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे मृत्युसंबंधीं सुचलेले विचार. )

॥ पृथ्वी ॥

अहो बहुत मातला यम स्वतंत्र का जाहला ? ।
वरिष्ठ अधिकारि का कुणि न यावरी राहिला ? ॥
न दंडिसि उदंड का अजुनि दांडग्याला अशा ? ।
खलास स्वबलोद्धता, सदय सर्वसत्ताधिशा ॥ १ ॥
जुलूम करिती तुझ्या पदरचे जरी नौकर ।
जरी न बडतर्फ ह्या करित दंडुनी त्वत्कर ॥
तरी न बहु दोष ह्या सकल मर्त्य राजांप्रती ।
वृथाच अम्हि निंदितों बहु कजाग त्या संप्रती ॥ २ ॥
असेंहि म्हणशील कीं हननकार्यकर्ता, मना ।
निसर्गनियमेंचि तो गमत दुष्ट साऱ्या जनां ॥
कळे, न टळतें प्रभो ! मरण सृष्टवस्तूंस तें ।
विशेष परि वक्रता भरतभूवरी भासते ॥ ३ ॥
गताब्दि गिळिलीं प्रभो ! कितिक कोवळीं बालकें ।
किती तरुण भक्षिले ! किति कवी ! किती बोलके ॥
गुरेंहि न उरों दिलीं ! अहह हा अधाशी किती ।
खळें छुळुनि सोडिली भरतभूमिका संप्रती ॥ ४ ॥

हरी अहह आमच्या गुणनिधान त्या माधवा।
जनकृतिनियामकीं उचित क्रौर्य का माधवा ?
गणोनि कृतमंतुला बहुत दंडितो हा अम्हा।
स्वयें असुनि चोरटा, नचि जुमानितो तो तुम्हां ॥ ५ ॥
शके न सुबलान्विता जनपदा छलाया खल।
हताश जन गांजुनी मिरवि भ्याड जेथें बल ॥
अहा ठकविलें, कले ! विभवशौर्यशाली जनां।
हरोनि विजया तरी चुकत हीहि मत्कल्पना ॥ ६ ॥
गताब्दि पशु मानवें गिळुनि काय हा जेविला।
रमेश मुखशुद्धिला रुचिर जांब की सेविला ॥
लवंग विजया भली चरचरोनियां चाविली।
खलांस, प्रभु ! पाहिजे तव गदा तुवां दाविली ॥ ७ ॥
जगत्रय थरारतें बघुनि यत्प्रतापाप्रती।
नयत्व अनयासही वद्‌वी तें जनीं संप्रती ॥
ढिलें करुनि टाकिलें प्रबल आंग्लबाहु असे।
यमा नियमिण्या जगीं नचि समर्थ कोणी दिलें ॥ ८ ॥
अधीं जनहताश हे विगत वैभवें पोळले।
तशांत परतंत्रता जखिणिनें पुरें भारिलें ॥
अशा छळुनियां यमा मिळत काय कीर्ती जनां।
स्वतुल्य गडि आढळे तरिच मर्द दे सामना ॥ ९ ॥
अधीं निपजती किती झटति देशकार्यी असे ।
तशांत सम कोणिही विबुध माधवाच्या नसे ॥
म्हणोनि रडतों प्रभू ! न बहु न्यायमूर्तीस्तव।
स्वभक्त-जनकामदा ! विफल हो न माझा स्तव ॥ १० ॥
स्वदेशहितसाधका जनन हें असो सर्वदा।
खुशाल मग मारवीं यमकरें अगा सर्वदा ॥
तसेच नृपती सुधी सतत शोभवो ही मही।
जगत्रय प्रभो ! असो सफल नम्र तक्रार ही ॥ ११ ॥
कैलासवासी न्यायमूर्तीचे मरणानंतर रचल्या आहेत.

सन १९०१
वय १७ [ १८ ? ]



—१०—

॥ आर्या ॥

निर्मुनियां ब्रह्मांडें शतकोटि भरोनि त्यांत उरणारा ॥
भूजल-तेजादिक ह्या तत्त्वांचें आद्यजनन करणारा ॥ १ ॥
शीर्षें सहस्र ज्याला अगणित मुखनयनहस्त याहि जया ॥
दावियलें यद्‌रूपा यदुपतिनें स्वरिपुशीर्षपाद जया ॥ २ ॥
तर्क्य न योगींद्राहीं, गम्य न मुक्तांसही गमावा तो ॥
शतकोटी विश्वाच्या अवकाशींही पुरा नमावा तो ॥ ३ ॥
ज्याला गाती छंदोबद्‌ध ऋचा जपुनि वेद चार सदा ॥
ज्याच्या वरप्रसादें स्रवतें धनधान्यकंद फलरस हा ॥ ४ ॥
श्रीमद्‌व्यासें केली यत्स्तवनाला पुराणग्रंथकला ॥
अठरांदा गाउनिही यद्‌महिमा पूर्ण नेणतां थकला ॥ ५ ॥
ना आकृति स्वयें परि स्वेच्छेस्तव जो अनंतरूपानें ॥
नटला झाला आपण सर्वचि तृणधान्यजलतरूपानें ॥ ६ ॥
ज्याला मुकुंद कोणी कोणि घनश्याम राम मानावें ॥
वानावें शिव माधव कोणी केव्हां कसेंहि ज्या गावें ॥ ७ ॥
त्या शुद्ध स्वयंप्रज्ञा अव्यक्ता नित्य स्वात्मलीनातें ॥
नमितों कीं पूत करो ! मातें अज्ञानतम-मलीनातें ॥ ८ ॥
वंदुनि त्या जगदीशा वाचकवृंदा नमी अनंत रहा ॥
सदयानों ईशकृपाकीर्तिस्वरूपें तुम्ही अनंत रहा ॥ ९ ॥
अब्दवरी जी केली सेवा अपुली स्वशक्तिच्या मानें ॥
मानुनि घ्यावी तुम्ही सख्यांनी सर्व तीस प्रेमानें ॥ १० ॥
चुकलों असेन कोठें अंतरलोंही असेन सेवेला ॥
व्हावी क्षमा तयाची क्षमण्या संता नसे मुळीं वेला ॥ ११ ॥
‘ गणपति ’ला ‘ श्रीकृष्णा ’ ‘ मोहिनिराजा ’स ‘ विश्वनाथा ’ला ॥
माझ्या लेखकवृंदा शिव दे मागेन विश्वनाथाला ॥ १२ ॥
पुनरपि निर्मलहृदयें वाचकवृंदासि हें असो नमन ॥
सेवेपासुनि ज्यांच्या सत्यचि ढळलें कदापि हें न मन ॥ १३ ॥

ठेवी लेखनिला ह्या विनवूनि शिवार्थेची विनायक तो ॥
नायक तो जगताचा भक्त स्तवनासि मुदित आयकतो ॥ १४ ॥

[फर्ग्यूसन कॉलेजच्या पहिल्या क्लबच्या मॉडेल बीकिलीकरतां त्याचें चालकत्व असतांना केल्या होत्या. २१–९–१९०२, वय १९]

—११—

अन्यायासहि ये जगीं जय जईं धैर्या धरोनी तदा ॥
जे न्यायाप्रति रक्षण्यास धजती सोसोनिही आपदा ॥
ऐशा धन्य नराग्रणींसह घडे आम्हांप्रती संग हा ॥
झालों धन्य अम्ही सुनंदयुतही झाली दिवाळी पहा ॥ १ ॥

[चौथ्या क्लबच्या मंडळींच्या आग्रहावरून ५ मिनिटांत रचलेला (श्लोक) १०–१०–१९०२]

—१२—

॥ आर्या ॥

हे मित्रा 'श्रीकृष्णा,' छे 'दाजी' तरिहि मोद दे न मना ॥
"मामा" ह्याचि प्रेमळ हांकेला देत अर्पितों नमना ॥ १ ॥

जे आपण घालविले प्रेमाच्या चंद्रिका करें भरलें ॥
आठवती का ते दिन जे निमिषार्धांत वाटती सरले ॥ २ ॥

संध्यासमयीं बसलों बागेंत पहात श्री तया सरुची ॥
आठवते का कैसी भासलि ते सुखद उभयांस रुची ॥ ३॥

निर्मात्सर्यें प्रेमें केल्यासि तुझा विनोद स्यां शतदां ॥
आठवते का कैसा कोपें क्षणिकें न गेललासि तदा ॥ ४ ॥

स्वज्ञानाची उभयें करुनि कवायीत स्वाभिमत शूर ॥
आठवते का कैसें विजयानंदांत जाहलों चूर ॥ ५ ॥

पोटीं राग नसोनिही उगिच अबोले कितीकदां व्हावें ॥
उभयांसही न कळतां कैसें तत्काल बोलुं लागावें ॥ ६ ॥

क्षुल्लकशा मानास्तव कोणें क्षणिकें रुसोनियां बसलों ॥
दृष्टीस दृष्टि मिळतां हेतुव्यतिरिक्त उभयही हसलों ॥ ७ ॥



देशास्तव गांभीर्यें कारस्थानासि योजुं लागावें ॥
केव्हां प्रेमें कैसें श्रीमच्छिवराजकीर्तिला गावें ॥ ८ ॥

हें सर्व आठवे का देतें तत्स्मरण काय मोद मना ॥
किंवा त्याविण येते त्वत्पत्र न मजसि विरहंभरद मना ॥ ९ ॥

स्मरतचि असेल सारें कैशा शकसील त्यास विसराया ॥
ज्या आयुर्भागाचा लाभ घडेना बड्या बड्या रायां ॥ १० ॥

ऐशा धन्य वयामाधिं विद्यालयशा सुधन्यतर स्थाळिं जे ॥
ईशकृपें घडलें तें मित्रत्व न काय धन्यतम साजे ॥ ११ ॥

मनभूमिकेंत परिचय–माळी मित्रत्व–वृक्ष जो लावी ॥
स्नेहजलानें पूरित घागर त्वां त्यास नित्य घालावी ॥ १२ ॥

कुशली मी, अधिकोत्तर नच, युष्मत्क्षेम तूंहि कळवावें ॥
बळवावें सचरिता स्वज्ञाति–सुकीर्ति–पट न मळवावे ॥ १३ ॥

मि. रा. दाजी ना. आपटे यांस टाकलेल्या पत्रांतील वेंचे आहेत.

ता. १–१२–१९०२
वय १९

—१३—

॥ द्रुत विलंबित ॥

भुवनमंडप थोर उभारिला ॥
गगन हेंचि गमे छत त्याजला ॥
चमकती कितीकचि चांदणी ॥
सुरसभेंतिल दीपचि ये मनीं ॥ १ ॥

रव मनोहर ते करते तधीं ॥
परतती स्वपुराप्रति गोपधी ॥
दशदिशांप्रति व्यापिति गोरज ॥
मग मुहूर्त गणी द्विज गोरज ॥ २ ॥

ऋषि अले; बुध मंगलही अले ॥
सकल मंडप शोभविती भले ॥
मग गुरूजन सत्वरिं पातला ॥
त्वरित वाक्कृत निश्चय जाहला ॥ ३ ॥

सुरनदी पुरवीत जलां तदा ॥
वधुवरीं मग फेकिति अक्षदा ॥
वरशशीजवळी वधु-रोहिणी ॥
हंसति दिग्युवती भंवती मनीं ॥ ४ ॥

बघुनि लग्नविधी नभिं हा निका ॥
स्मरणि येई निमंत्रण-पत्रिका ॥
शशि बघोनि तुला स्मरलों सख्या ॥
बघुनि रोहिणि ये मनिं त्वप्रिया ॥ ५ ॥

शशि खुले वर रोहिणिला जसा ॥
खुलत तूं असशील तिला तसा ॥
खुलवि रोहिणि ती शशिला जशी ॥
तव प्रियाहि असेल तुला तशी ॥ ६ ॥

करुनि ही तुलना फसलों परी ॥
अहह मी किति दुःखित अंतरीं ॥
शशिसि तूं तशि रोहिणीहि ती ॥
उभयतुल्य असां उभयांप्रती ॥ ७ ॥

परम जीवसखा शशिचा असा ॥
मदन तो गणतो तव मीं तसा ॥
स्वसुहृदासि सपत्निक पाहुनी ॥
मदन धन्य असें गमतें जनीं ॥ ८ ॥

परि न तत्सम कां मम भाग्य तें ॥
अहह संपत कां तुलना इथें ॥
मम सख्यासि सपत्निक पाहुनी ॥
नयन धन्य न हे, सलतें मनीं ॥ ९ ॥

नयन हेंचि परी न शरीर तें ॥
मन खरें शरिराप्रति शासतें ॥
म्हणुनि यद्यपि देह असे इथें ॥
मन सख्या तुझिया चरणीं तिथें ॥ १० ॥

सकल सृष्टित पंचम तत्त्व तें ॥
न दिसतांहि चराचर व्यापितें ॥



मन तसें मम ना दिसतां तुतें ॥
वसत लग्नविधींत असेल तें ॥ ११ ॥

कळुनि हें न विवाहविधि प्रती ॥
ठकवुनी न अला मज दुर्मती ॥
म्हणुनि घेइल कोप तुझी मती ॥
कथित यास्तव सत्यकथाचि ती ॥ १२ ॥

तव विवाहविधिप्रति येउनी ॥
स्वनयनें करुं धन्य असें मनीं ॥
कितिक यत्न तदर्थक योजिले ॥
अहह निष्फळ ते परि जाहले ॥ १३ ॥

समयिं या मम मातुल-पुत्रिचा ॥
शनिदिनींच विवाह ठरे तिचा ॥
म्हणुनि गुंतुनि देह असें इथें ॥
मन तुझ्याचि विवाहविधींत तें ॥ १४ ॥

प्रियसख्या समजोनि दया करीं ॥
करु क्षमा तव सन्मति कीं करी ॥
प्रणत मित्र अहेर तुला करी ॥
धवल प्रेम तयाप्रति स्वीकरी ॥ १५ ॥

सुकविता वनिता सरसासती ॥
तुजसि आरतिला करण्याप्रती ॥
त्वरित त्वप्रति येत सुशोभना ॥
बहुत उत्सुक त्वन्मुखदर्शना ॥ १६ ॥

तिजसि मानुनि मत्सम मत्परी ॥
बहुत गौरव दावुनि आदरी ॥
मग दयाब्धि जगताचिया पती ॥
सतत रक्षिल नूतन दंपती ॥ १७ ॥

ह्या कविता मि. रा. श्री. वा. गोखले ह्यांच्या लग्नविधिप्रीत्यर्थ केल्या होत्या.

ता. १५-२-१९०३
वय २० वे.

—१४—

## एक स्वप्न

॥ दिंडी ॥

अली कोमलिं कमलोदरीं सरींच्या ॥
सकल वसुधा सिंधूंत चंद्रिकेच्या ॥
सुतनु सुंदरि संगांत प्रियकराच्या ॥
मग्न, मीही भुजयुग्मि मग निशेच्या ॥ १ ॥

कौमुदीच्या हिमधवल सुप्रवाहीं ॥
कमल भासे यन्वदन सौख्यदायी ॥
हस्त ज्याचा मत्कंठि हार झाला ॥
'भाउ' होता शेजारीं मम निजेला ॥ २ ॥

गाढ निद्रा लागली उभयतांना ॥
कथित असतांना रम्य कथा नाना ॥
पुढें मध्यंतरि काय घडलि वार्ता ॥
ती न आम्हा मुळि तर्क्य दिसे आतां ॥ ३ ॥

जरी केव्हां कोठून आणि कैसें ॥
हा न कांहीं मुळि मेळ मनीं बैसे ॥
परी भाऊच्या सदनिं उभय आलों ॥
असे बघते आम्हांस आम्ही झालों ॥ ४ ॥

तेथुनीयां मग माडिवरी येतां ॥
खिडकितूनी डुंकोनि बघूं जातां ॥
दिसलि खालीं बहु सरसरसयुता ती ॥
पूर्णपात्रा नदि एक जात होती ॥ ५ ॥

काल होता तो मार्ग आजि जेथें ॥
नदी कैशी ? मन घेइ विस्मयातें ॥
तिची शोभा दे अधिक विस्मयाला ॥
प्रथम विस्मय दुसऱ्यांत लीन झाला ॥ ६ ॥

काय आली आकाशनदी खालीं ॥
भूमि किंवा आकाशगामि झाली ॥



न तरि येता ना धवल जल तटा या ॥
शशी रोहिणीसह केलिला कराया ॥ ७ ॥

फेनराशी कीं हास्यकान्ति आहे ।
मत्स्य तळपे कीं नेत्रबाण आहे ॥
विमल जल हें कीं धवल वसन आहे ।
नदी वाहे कीं तरुणि क्रीडताहे ॥ ८ ॥

नयन अमुचे तों बघति एकमेकां ।
आपुझाली जणुं सांगण्यासि शंका ॥
क्षणैकानें मग करिति ठरावा हें ।
तरुणि नोहे, गंभीर नदी वाहे ॥ ९ ॥

"भाऊ जाऊं पोहून परतटाला ।
तेथ जन जलिं बघ घेति विलासाला" ॥
"परी इतुकें झेपेल पोहणे का ?" ।
"सहज जाऊं चल भाउ सोड शंका" ॥ १० ॥

खिडकिखालीं साशंक पाहियेलें; ।
पात्र परतटपर्यंत न्याहळीलें; ॥
एकमेकां उभयांहि नीरखीलें ।
उडी पडली ! जलवृष्टि उभय आले ॥ ११ ॥

अगाधा त्या परि बघुनि जलनिधीतें ।
दृष्टि फिरते अवसान सर्व जातें ॥
भीति आंतिलही परि न फोडणें ती ।
असे नेत्रांना सक्त हुकुम होती ॥ १२ ॥

दावियेलें बरि धैर्य बहुपरीनें ।
दुजा भीतिस येईल या भयानें ॥
हात दमले परि तोचि जशी काही ।
बसे गटकळि भयभीत उभयताही ॥ १३ ॥

"भाउ गेलों" हे शब्द कांही आले ।
भाउ भाऊ नदिमाजि हा बुडाले ॥
नवल अद्‌भुत परि आम्ही बुडालों तें ।
अम्हिच झालों खिडकींतुनी पहाते ॥ १४ ॥

अम्हा बुडतां बाहेर काढण्यातें ।
अम्हिच जाऊं तईं खालिं यावयातें ॥
जिन्यातुनि जणुं घाईत पायरी तों ।
चुकुनि आम्ही धडधडुनि खालिं येतों ॥ १५ ॥

असा हिसका बसतांच शरीरातें ।
पुरी आली दचकोनि जाग मातें ॥
कुशलि देखुनि भाऊसि मोद झाला ।
दिलें आलिंगन प्रेमभरें त्याला ॥ १६ ॥

पुणें येथें फर्ग्युसन कॉलेजांत प्रिय भाऊ ( विष्णु महादेव भट ) माझा कम्पॅनियन असतांना वरील स्वप्न पडलें व तें जरा मजेशीर असल्यानें बर कवितेंत दिलें.

ता. १४-२-१९०४

—१५—

## श्री टिळक-मुक्ततोत्सव

॥ फटका ॥

आर्यभूमिचा भालतिलकची बालतिलक त्या जय आला ।
झाला रिपुगण चूर म्हणूनी तज्जयजयकारा केला ॥
दिशासुंदरा होति प्रफुल्लित कुमुदनाथ हा हास्य करी ।
वायु वाहती मंद मंद मकरंद गंध भूभाग करी ॥ १ ॥
वसुंधरा न्हातसे सुंदरा धवल तमीं चंद्रिका जळीं ।
विस्मित सारा तारागण हा सस्मित कां आकाशतटीं ? ॥ २ ॥
ऐका परि हा ध्वनी येतसे कोठुनियां गंभीर अती ।
" श्रीमत्तिलकव्यसनवारणोत्सव हा मोदें सुर करिती " ॥ ३ ॥
चला तरी मग सुरांसह श्रीतिलकनाथ की जय बोला ।
झाला तुमचा देशपिता निष्कलंक नभ दे संमतिला ॥ ४ ॥

× × ×

पचते आहे नरकामाजी दुष्कर्मास्तव कुलटा[1] जी
ती साध्वी अणि तिलक कलंकी काय न्याय हा उलटा जी ॥ १ ॥
सरकारा तर ऊतचि आला धरितांना श्रीतिलकाला ॥
हर्षें दुर्जन नाचुं लागला सुजनसंघ करि दुःखाला ॥ २ ॥

१ ताईमहाराज.

श्री टिळक मुक्ततोत्सव.

फटका.

॥ आर्यभूमिचा भालतिलकची बालतिलक त्या जय आला.
॥ झाला रिपुगण चूर म्हणुनी तज्जयजयकारा

दिशासुंदरा होते प्रफुल्लित कुमुदनाथ हा हास्य करी
वायु वाहति मंद मंद मकरंद गंध भूभाग भरी, १.
वसुंधरा न्हातसे सुंदरा धवल तमीं चंद्रिका जळीं,
विस्मित सारा तारागण हा सस्मित कां आकाशतटीं २
ऐका परि हा ध्वनी येतसे कोठुनियां गंभीर अती,
" श्रीमत्तिलकव्यसनवारणोत्सव हा मोदें सुर करिती,
चला तरी मग सुरांसह श्रीतिलकनाथकी जय बोला
झाला तुमचा देशपिता निष्कलंक नभ दे संमतिला।
॥ ३॥ ४

पचते आहे नरकामाजी दुष्कर्मास्तव कुलटा[1] जी,
ती साध्वी आणि तिलक कलंकी काय न्याय हा उलटा जी,
सरकारा तर ऊतचि आला धरितांना श्रीतिलकाला,
हर्षें दुर्जन नाचु लागला सुजनसंघ करि दुःखाला ॥२॥

१ ताईमहाराज.